भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

# नागरिकत्व अधिनियम, १९५५

**(१९५५ चा अधिनियम क्रमांक ५७)**

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान ]

# The Citizenship Act, 1955

**(Act No. 57 of 1955)**

*[As in force on the 2nd May 1997]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००३

**[किंमत : रु. ६.००]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ मे १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दी सिटिझनशिप अ‍ॅक्ट, १९५५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ यात पृष्ठे ५९ ते ६७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्रधिकाराने प्राकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाच्या प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Citizenship Act, 1955, 2nd May 1997 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997 on pages 59 to 67.

This authoritative text was published under the authority of the president under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd October 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

(दोन)

## विशोधन अधिनियम

'नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ६५)
'नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५' (१९८५ चा ६५)
'नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८६' (१९८६ चा ४)
'नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८६' (१९८६ चा ५१)

# नागरिकत्व अधिनियम, १९५५

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव.
२. निर्वचन.

नागरिकत्वाची प्राप्ती

३. जन्मतः नागरिकत्व.
४. वंशोद्भवतः नागरिकत्व.
५. नोंदणीद्वारे नागरिकत्व.
६. नागरिकीकरणाद्वारे नागरिकत्व.
६क. आसाम निवाड्याच्या कक्षेत येणाऱ्या व्यक्तींच्या नागरिकत्वासंबंधी विशेष उपबंध.
७. भूप्रदेशाच्या समावेशाद्वारे नागरिकत्व.

नागरिकत्वाची समाप्ती

८. नागरिकत्वाचा त्याग.
९. नागरिकत्वाची समाप्ती.
१०. नागरिकत्वापासून वंचित करणे.

पूरक

११. राष्ट्रकुलाचे नागरिकत्व.
१२. विवक्षित देशाच्या नागरिकांना भारतीय नागरिकांचे अधिकार प्रदान करण्याची शक्ती.
१३. संदेहास्पद बाबतीत नागरिकत्वाचे प्रमाणपत्र.
१४. कलमे ५ व ६ यांखालील अर्ज निकालात काढणे.
१५. पुनरीक्षण.
१६. शक्तींचे प्रत्यायोजन.
१७. अपराध.
१८. नियम करण्याची शक्ती.
१९. [निरसित.]
पहिली अनुसूची.
दुसरी अनुसूची.
तिसरी अनुसूची.
शब्दसूची इंग्रजी-मराठी.
शब्दसूची मराठी-इंग्रजी.

# नागरिकत्व अधिनियम, १९५५

## (१९५५ चा अधिनियम क्रमांक ५७)

(दिनांक २ मे, १९९७ रोजी यथाविद्यमान)

[३० डिसेंबर, १९५५]

**भारतीय नागरिकत्वाची प्राप्ती व समाप्ती यांविषयी उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. या अधिनियमास 'नागरिकत्व अधिनियम, १९५५', असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— निर्वचन.

(क्) "भारतातील एखादे शासन" याचा अर्थ, केंद्र शासन किंवा एखादे राज्य शासन, असा आहे ;

(ख्) "नागरिक" याचा पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या देशाच्या संबंधातील अर्थ, त्या देशात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या नागरिकत्व किंवा राष्ट्रीयत्व यांविषयीच्या कायद्यान्वये त्या देशाचा नागरिक किंवा राष्ट्रीय असेल ती व्यक्ती, असा आहे;

(ग्) "नागरिकत्व किंवा राष्ट्रीयत्व या विषयीचा कायदा" याचा पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या देशाच्या संबंधातील अर्थ, त्या देशाच्या विधानमंडळाची जी अधिनियमिती त्या देशाच्या शासनाच्या विनंतीनुसार केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या देशातील नागरिकत्व किंवा राष्ट्रीयत्व यांविषयी उपबंध करणारी अधिनियमिती असल्याचे घोषित केले असेल ती अधिनियमिती, असा आहे :

परंतु, संसदेच्या दोन्ही सभागृहांची पूर्वमान्यता असल्याखेरीज दक्षिण आफ्रिका संघराज्याच्या संबंधात अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही ;

(घ्) "भारतीय वाणिज्यदूतावास" याचा अर्थ, ज्या ठिकाणी जन्म नोंदवही ठेवण्यात येत असेल, असे भारत सरकारच्या कोणत्याही वाणिज्यदौतिक अधिकाऱ्यांचे कार्यालय किंवा असे कोणतेही कार्यालय नसेल त्या बाबतीत, विहित करण्यात येईल ते कार्यालय, असा आहे ;

(ङ्) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ, जी अठरा वर्षे वयाची झाली नसेल ती व्यक्ती, असा आहे ;

(च्) "व्यक्ती" या शब्दप्रयोगात कोणतीही कंपनी किंवा अधिसंघ किंवा मनुष्य व्यक्तींचा निकाय—मग तो निगमित असो किंवा नसो—यांचा समावेश होत नाही ;

(छ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ज्) "अखंड भारत" याचा अर्थ, मुळात जसा अधिनियमित करण्यात आला तसा 'भारत शासन अधिनियम, १९३५' यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे भारत, असा आहे.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, एखाद्या नोंदलेल्या जहाजावर किंवा वायुयानात, अथवा एखाद्या देशाच्या शासनाच्या नोंदणी न केलेल्या जहाजावर किंवा वायुयानात जन्मलेली व्यक्ती, ज्या ठिकाणी ते जहाज किंवा वायुयानात नोंदण्यात आले असेल अशा ठिकाणी किंवा, प्रकरणपरत्वे, त्या देशात जन्मली असल्याचे मानण्यात येईल.

(३) एखाद्या व्यक्तीच्या जन्माच्या वेळची त्या व्यक्तीच्या पित्याची स्थिती किंवा त्याचे वर्णन यासंबंधी या अधिनियमात जेव्हा कोणताही उल्लेख येईल तेव्हा, पित्याच्या मृत्यूनंतर जन्मलेल्या व्यक्तीच्या संबंधात पित्याच्या मृत्यूच्या वेळी असलेली त्याची स्थिती किंवा वर्णन यासंबंधीचा तो उल्लेख आहे, असा अर्थ लावण्यात येईल ; आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी तो मृत्यू घडला असून प्रारंभानंतर तो जन्म झाला असेल त्या बाबतीत, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर तो पिता मरण पावला असता तर त्याची जी स्थिती राहिली असती किंवा त्याला जे वर्णन लागू झाले असते, ती स्थिती किंवा वर्णन त्याच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या ठायी असल्याचे किंवा त्याला लागू असल्याचे मानण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ एखादी व्यक्ती अज्ञान नसेल तर, ती पूर्ण वयाची आहे आणि विकल मनाची नसेल तर ती पूर्णतः सक्षम आहे, असे मानण्यात येईल.

### नागरिकत्वाची प्राप्ती

३. [1][(१) पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले असेल त्याखेरीज, भारतात,— [1][जन्मतः नागरिकत्व.]

(क्) दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी किंवा त्यानंतर, परंतु नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८६ याच्या प्रारंभापूर्वी जन्मलेली ;

---

१. १९८६ चा अधिनियम ५१, कलम २ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल केले (दिनांक १ जुलै, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ख्) अशा प्रारंभास किंवा त्यानंतर जन्मलेली आणि जिच्या जन्माच्या वेळी तिच्या माता-पित्यापैकी कोणीही एक जण भारताचे नागरिक असेल अशी, प्रत्येक व्यक्ती भारताची जन्माने नागरिक बनेल.]

(२) एखाद्या व्यक्तीच्या जन्माच्या वेळी जर,—

(क्) अधिकारपत्र देऊन भारताच्या राष्ट्रपतींप्रत पाठविलेल्या एखाद्या परकीय सार्वभौम राज्य सत्तेच्या दूतास दावे व वैध आदेशिका यांपासून मिळणारी उन्मुक्ती तिच्या पित्याला मिळाली असून तो भारताचा नागरिक नसेल तर ; किंवा

(ख्) त्या व्यक्तीचा पिता शत्रूदेशीय असून त्या वेळी शत्रूच्या कब्जात असलेल्या ठिकाणी त्या व्यक्तीचा जन्म झाला असेल तर,

ती व्यक्ती या कलमाच्या आधारे असा नागरिक बनणार नाही.

वंशोद्भवतः नागरिकत्व.

४. [1][(१) भारताबाहेर जन्मलेली एखादी व्यक्ती—

(क्) जिचा जन्म २६ जानेवारी, १९५० ला किंवा त्यानंतर झाला असेल परंतु नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९९२ च्या प्रारंभाच्या पूर्वी झाला असेल व जर तिचा पिता तिच्या जन्माच्या वेळी भारताचा नागरिक असेल तर, ती वंशोद्भवतः भारताची नागरिक असेल ; किंवा

(ख्) अशा प्रारंभाच्या वेळी किंवा त्यानंतर तिच्या जन्माच्या वेळी तिच्या पालकांपैकी कोणीही एक भारताची नागरिक असेल तर, ती वंशोद्भवतः भारताची नागरिक असेल :]

[2][परंतु आणखी असे की, खंड (ख्) मध्ये संदर्भित केलेल्या अशा एखाद्या व्यक्तीच्या पालकांपैकी कोणीही एक फक्त वंशोद्भवतः भारताची नागरिक असेल तर ती व्यक्ती,—

(क्) जर तिच्या जन्माची नोंदणी जन्म झाल्यापासून एका वर्षाच्या आत भारतीय वाणिज्य दूतावासात किंवा नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९९२ च्या प्रारंभाच्या वेळी, जे कोणतेही नंतरचे असेल तेव्हा, केंद्र सरकारच्या परवानगीने असा कालावधी संपल्यानंतरही, केली गेली नसेल तर ; किंवा

(ख्) तिच्या पालकांपैकी कोणीही एक तिच्या जन्माच्या वेळी भारत सरकारच्या सेवेमध्ये नसेल तर,

या कलमाच्या प्रयोजनार्थ ती भारताची नागरिक होणार नाही.]

(२) केंद्र शासनाने तसा निदेश दिल्यास जन्म-नोंदणीपूर्वी त्याची परवानगी घेतलेली नसली तरीही, या कलमाच्या प्रयोजनार्थ, त्या शासनाच्या परवानगीने जन्म-नोंदणी करण्यात आली होती असे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मधील परंतुकाच्या प्रयोजनार्थ अखंड भारताबाहेर जन्मलेली जी [3][व्यक्ती] संविधानाच्या प्रारंभकाळी भारताचा नागरिक होती किंवा तशी असल्याचे मानण्यात आले होते अशी व्यक्ती वंशोद्भवतःच भारताचा नागरिक असल्याचे मानण्यात येईल.

नोंदणीद्वारे नागरिकत्व.

५. (१) या कलमाचे उपबंध आणि विहित करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंध यांच्या अधीनतेने, संविधानाच्या आधारे किंवा या अधिनियमाच्या इतर उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाच्या आधारे जी व्यक्ती आधीच अशा प्रकारचा नागरिक बनलेली नसून पुढीलपैकी कोणत्याही प्रवर्गात जी मोडत असेल, अशा कोणत्याही व्यक्तीची, विहित प्राधिकरणास या बाबतीत आलेल्या अर्जावरून भारताचा नागरिक म्हणून नोंदणी करता येईल :—

(क्) मूळच्या भारतीय असलेल्या ज्या व्यक्ती भारताच्या सामान्यपणे निवासी असून नोंदणीसाठी अर्ज करण्याच्या निकटपूर्वी [4][पाच वर्षे] याप्रमाणे निवासी असतील अशा व्यक्ती ;

(ख्) मूळच्या भारतीय असलेल्या ज्या व्यक्ती अखंड भारताबाहेर कोणत्याही देशाच्या किंवा ठिकाणच्या सामान्यपणे निवासी असतील अशा व्यक्ती ;

[5][(ग) एखाद्या व्यक्तीचे लग्न भारतातील एखाद्या नागरिकाशी झालेले आहे किंवा झालेले होते आणि सामान्यपणे ती व्यक्ती भारतात राहत आहे आणि नोंदणीकरिता दिलेल्या अर्जाच्या लगतपूर्वी पाच वर्षांपासून ती अशा प्रकारे राहात आहे.]

---

१. १९९२ चा अधिनियम ३९ चे कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाचे कलम २ द्वारे नवीन घातले.

३. वरील अधिनियमाचे कलम ३ द्वारे "पुरुष व्यक्ती" च्या ऐवजी घातले.

४. १९८६ चा अधिनियम ५१ चे कलम ३ द्वारे "सहा महिने" याच्या ऐवजी घातले (दिनांक १ जुलै, १९८७ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (दिनांक १ जुलै, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(घ) भारताचे नागरिक असणाऱ्या व्यक्तींची अज्ञान अपत्ये ; आणि

(ङ) पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या देशाच्या ज्या नागरिक आहेत अशा, सज्ञान वयाच्या व पूर्ण क्षमता प्राप्त झालेल्या व्यक्ती :

परंतु, अशा कोणत्याही देशाच्या व्यक्तींची कोणत्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने या खंडाखाली भारताचे नागरिक म्हणून नोंदणी करता येईल ते विहित करताना केंद्र शासन, भारताच्या नागरिकांना त्या देशाचा कायदा किंवा शिरस्ता यानुसार ज्या शर्तींच्या अधीनतेने नोंदणीद्वारे त्या देशाचे नागरिक बनता येते त्या शर्तींचा यथायोग्य विचार करील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखादी व्यक्ती जर स्वतः किंवा तिच्या मातापित्यांपैकी कोणीही [1][ * * * * ] अखंड भारतात जन्मलेले असेल तर, ती मूळची भारतीय असल्याचे मानण्यात येईल.

(२) सज्ञान वयाच्या कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यानुसार निष्ठेची शपथ घेतल्याखेरीज पोटकलम (१) खाली तिची भारताचा नागरिक म्हणून नोंदणी करण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमाखाली ज्या व्यक्तीने आपल्या भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला आहे किंवा जिला त्यापासून वंचित केले गेले आहे अथवा जिचे भारतीय नागरिकत्व समाप्त करण्यात आलेले आहे अशा कोणत्याही व्यक्तीची, केंद्र शासनाने आदेश दिल्याखेरीज पोटकलम (१) अन्वये भारताचा नागरिक म्हणून नोंदणी करण्यात येणार नाही.

(४) अशी नोंदणी करणे समर्थनीय ठरेल अशी विशेष परिस्थिती अस्तित्वात आहे, अशी जर केंद्र शासनाची खात्री झाली तर, त्याला कोणत्याही अज्ञान व्यक्तीची भारताचा नागरिक म्हणून नोंदणी करवता येईल.

(५) या कलमाखाली नोंदलेली व्यक्ती, ज्या दिनांकापासून तिची याप्रमाणे नोंदणी करण्यात आली असेल त्या दिनांकी व तेव्हापासून नोंदणीद्वारे भारताचा नागरिक होईल आणि संविधानाचा अनुच्छेद ६, खंड (ख) (दोन) किंवा अनुच्छेद ८ याच्या उपबंधान्वये नोंदलेली व्यक्ती ही संविधानाचा प्रारंभ-दिनांक किंवा ज्या दिनांकास याप्रमाणे नोंदणी झाली तो दिनांक यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकी व तेव्हापासून नोंदणीद्वारे भारताचा नागरिक झाली असल्याचे मानण्यात येईल.

नागरिकीकरणाद्वारे नागरिकत्व.

६. (१) पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या देशाचा नागरिक नसेल अशा, सज्ञान वयाच्या व पूर्ण क्षमतेच्या कोणत्याही व्यक्तीने आपणास नागरिकीकरण प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी विहित केलेल्या रीतीने अर्ज केला असेल त्या बाबतीत, तिसऱ्या अनुसूचीच्या उपबंधान्वये नागरिकीकरण होण्यास अर्जदार अर्ह आहे, अशी केंद्र शासनाची खात्री झाली तर, केंद्र शासन त्यास नागरिकीकरणाचे प्रमाणपत्र देऊ शकेल :

परंतु जर, केंद्र शासनाच्या मते अर्जदार म्हणजे जिने विज्ञान, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, जागतिक शांतता किंवा सर्वसाधारणपणे मानवजातीची प्रगती यासंबंधात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे अशी व्यक्ती असेल तर, केंद्र शासनाला तिसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी सर्व किंवा कोणत्याही शर्ती दुर्लक्षिता येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये जिला नागरिकीकरणाचे प्रमाणपत्र देण्यात आले असेल अशी व्यक्ती, दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यानुसार तिने निष्ठेची शपथ घेतल्यानंतर, ते प्रमाणपत्र तिला ज्या दिनांकास देण्यास आले असेल त्या दिनांकी व तेव्हापासून नागरिकीकरणाद्वारे भारताचा नागरिक होईल.

[2][आसाम निवाड्याच्या कक्षेत येणाऱ्या व्यक्तींच्या नागरिकत्वासंबंधी विशेष उपबंध.]

[2][६क. (१) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "आसाम" याचा अर्थ, नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी आसाम राज्य समाविष्ट केलेले भूप्रदेश असल्याचे तपासान्ती निष्पन्न होणे, असा आहे;

(ख) "विदेशी म्हणून तपास लावणे" याचा अर्थ, विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ (१९४६ चा ३१) आणि विदेशी व्यक्ती (न्यायाधिकरण) आदेश, १९६४ याच्या उपबंधानुसार, त्या आदेशाद्वारे घटित केलेल्या न्यायाधिकरणाने विदेशी व्यक्ती असल्याचे तपासान्ती निष्पन्न होणे, असा आहे ;

(ग) "विनिर्दिष्ट भूप्रदेश" याचा अर्थ, नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभीच्या निकटपूर्वी समाविष्ट केलेला भूप्रदेश, असा आहे ;

---

१. १९८६ चा अधिनियम ५१ चे कलम ३ द्वारे "किंवा तिच्या आजाआजीपैकी कोणीही" हे शब्द वगळले (दिनांक १ जुलै, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८५ चा अधिनियम ६५, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (दिनांक ७ डिसेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

(घ) जर एखादी व्यक्ती किंवा तिच्या मातापित्यांपैकी कोणीही एक किंवा आजी-आजोबांपैकी कोणीही एक फाळणीपूर्व भारतात जन्मलेली असेल तर ती व्यक्ती मूळ भारतीय आहे, असे मानले जाईल ;

(ङ) विदेशी (न्यायाधिकरण) आदेश, १९६४ याखाली घटित झालेले न्यायाधिकरण ज्या तारखेला एखादी व्यक्ती विदेशी असल्याबद्दलचा आपला अहवाल संबंधित अधिकारी किंवा प्राधिकरण यांच्याकडे सादर करील त्या तारखेपासून ती व्यक्ती विदेशी असल्याचे मानले जाईल.

(२) पोटकलम (६) व (७) च्या उपबंधाच्या अधीन राहून ज्या व्यक्ती १ जानेवारी, १९६६ पूर्वी आसाममध्ये विनिर्दिष्ट भूप्रदेशातून आल्या असतील अशा (यात, १९६७ साली झालेल्या लोकसभेच्या सर्वसाधारण निवडणुकीच्या प्रयोजनार्थ ज्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट केली आहेत अशा व्यक्तींचा समावेश आहे) आणि ज्या व्यक्ती आसाममध्ये आल्याच्या तारखेपासून आसाममध्येच सर्वसाधारणतः राहत आहेत अशा सर्व मूळ भारतीय व्यक्ती १ जानेवारी, १९६६ पासून भारताच्या नागरिक असल्याचे मानले जाईल.

(३) पोटकलम (६) व (७) च्या उपबंधाच्या अधीनतेने मूळ भारतीय असलेली जी कोणतीही व्यक्ती—

(क) १ जानेवारी, १९६६ रोजी किंवा त्यानंतर परंतु २५ मार्च, १९७१ पूर्वी विनिर्दिष्ट भूप्रदेशामधून आसाममध्ये आलेली असेल; आणि

(ख) आसाममध्ये प्रवेशल्याच्या तारखेपासून सामान्यपणे आसामची रहिवाशी असेल ; आणि

(ग) ती विदेशी असल्याचे तपासान्ती निष्पन्न झाले असेल,

अशी प्रत्येक व्यक्ती, केंद्र सरकारने कलम १८ अन्वये या संदर्भात तयार केलेल्या नियमानुसार त्या नियमात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे (या पोटकलमात यापुढे नोंदणी करणारे प्राधिकरण म्हणून जे निर्देशिण्यात आले आहे) स्वतःची नोंदणी करून घेईल आणि जर तिचे नाव अशा तपासाच्या दिनांकास अंमलात असलेल्या कोणत्याही विधानसभेच्या किंवा संसदेच्या निर्वाचन क्षेत्राच्या मतदार यादीत समाविष्ट असेल तर तिचे नाव त्यामधून वगळण्यात येईल.

स्पष्टीकरण.—ह्या पोटकलमाखाली नोंदणी करून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत विदेशी (न्यायाधिकरण) आदेश, १९६४ अन्वये घटित करण्यात आलेल्या न्यायाधिकरणाचे, ती व्यक्ती विदेशी असल्याबद्दलचे मत हे खंड (ग) च्या आवश्यकतेनुसार पुरेसा पुरावा मानला जाईल. आणि जर, अशी व्यक्ती ह्या पोटकलमाखालील इतर कोणत्याही आवश्यकतांचे अनुपालन करीत आहे किंवा कसे असा कोणताही प्रश्न उद्भवला तर नोंदणी करणारे प्राधिकरण,—

(एक) जर असे मत व्यक्त करताना त्यात इतर आवश्यकतांच्या बाबतीतील निष्कर्षांचाही अंतर्भाव असेल तर अशा निष्कर्षास सुसंगत अशा रीतीने तो प्रश्न निकालात काढला जाईल.

(दोन) जर असे मत व्यक्त करताना इतर आवश्यकतांच्या बाबतीतील निष्कर्षांचा अंतर्भाव केलेला नसेल तर उक्त आदेशान्वये घटित केलेल्या व केंद्र सरकारने कलम १८ अन्वये या संदर्भात केलेल्या नियमानुसार अधिकारिता असलेल्या न्यायाधिकरणाकडे तो प्रश्न निर्देशित करील, आणि अशा निर्देशानंतर मिळालेल्या अभिप्रायानुसार त्या प्रश्नावर निर्णय घेईल.

(४) पोटकलम (३) खाली नोंदणी केलेल्या व्यक्तीस, ती विदेशी असल्याचे तपासान्ती निष्पन्न झाल्याच्या तारखेपासून दहा वर्षांचा कालावधी समाप्त होईपर्यंत, भारताचा नागरिक म्हणून जे हक्क व बंधने असतात तेच हक्क आणि बंधने असतील (यात पासपोर्ट अधिनियम, १९६७ (१९६७ चा १५) अन्वये पासपोर्ट प्राप्त करण्याचा हक्क आणि त्याच्याशी संबंधित बंधने यांचाही समावेश असेल), परंतु, उक्त १० वर्षांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी तिचे नाव कोणत्याही विधानसभा किंवा संसदीय मतदार संघाच्या कोणत्याही मतदार यादीत कोणत्याही वेळी समाविष्ट केले जाण्यास ती हक्कदार असणार नाही.

(५) पोटकलम (३) खाली नोंदणी झालेली व्यक्ती ही ज्या तारखेला ती विदेशी असल्याचे तपासान्ती निष्पन्न झाले असेल त्या तारखेपासून व दहा वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यापासून, सर्व प्रयोजनासाठी भारताची नागरिक आहे, असे मानले जाईल.

(६) कलम ८ च्या उपबंधांना बाध न येता,—

(क) जर, पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५, याच्या प्रारंभीच्या तारखेपासून साठ दिवसाच्या आत विहित रीतीने व विहित नमुन्यात आणि विहित प्राधिकरणाकडे भारताचा नागरिक होण्याची आपली इच्छा नसल्याचे अधिकथन सादर केले असेल तर अशी व्यक्ती त्या पोटकलमाखाली भारताची नागरिक झाल्याचे मानण्यात येणार नाही ;

(ख) जर पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून किंवा ती विदेशी असल्याचे तपासान्ती निष्पन्न झाल्याच्या तारखेपासून, यापैकी जे नंतरचे असेल तेव्हापासून साठ दिवसांच्या कालावधीत विहित रीतीने व विहित नमुन्यात आणि विहित प्राधिकरणाकडे असे अधिकथन सादर केले की, तिची त्या पोटकलमाच्या आणि पोटकलमे (४) आणि (५) यांच्या द्वारे नियंत्रित होण्याची इच्छा नाही, तर त्या व्यक्तीला पोटकलम (३) खाली स्वतःची नोंदणी करून घेण्याची आवश्यकता असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमान्वये जिने अधिकथन सादर करणे आवश्यक आहे अशी कोणतीही व्यक्ती करार करण्यास सक्षम नसेल तेव्हा, त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे तिच्यावतीने काम पाहण्यास सक्षम असलेली कोणतीही इतर व्यक्ती तिच्या वतीने असे अधिकथन सादर करू शकेल.

(७) पोटकलम (२) ते (६) मधील कोणतीही गोष्ट पुढील कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाही —

(क) जो, नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभीच्या लगतपूर्वी भारताची नागरिक असेल अशी व्यक्ती;

(ख) जिला, नागरिकत्व (विशोधन) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभापूर्वी विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ (१९४६ चा ३१) अन्वये, भारतातून हाकलून देण्यात आले असेल, अशी व्यक्ती.

(८) ह्या कलमात व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, ह्या कलमाचे उपबंध त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी परिणामक होतील.]

७. जर कोणताही भूप्रदेश भारताचा भाग बनला तर, केंद्र शासनाला कोणत्या व्यक्ती त्या भूप्रदेशाच्या भूप्रदेशांशी संबंधित असल्याकारणाने भारताच्या नागरिक बनतील ते शासकीय राजपत्रात अधिसूचित समावेशाद्वारे केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करता येईल; आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकी व नागरिकत्व. तेव्हापासून त्या व्यक्ती भारताच्या नागरिक बनतील.

## नागरिकत्वाची समाप्ती

८. (१) सज्ञान वयाचा व पूर्ण क्षमता असलेला जो कोणताही भारताचा नागरिक दुसऱ्याही देशाचा नागरिक किंवा राष्ट्रिक आहे, त्याने आपल्या भारतीय नागरिकत्वाचा त्याग करण्यासंबंधी विहित रीतीने अधिकथन केले तर, विहित प्राधिकरणाकडून त्या अधिकथनाची नोंदणी करण्यात येईल, आणि अशी नोंदणी झाल्यानंतर त्या व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल : नागरिकत्वाचा त्याग.

परंतु, ज्या युद्धात भारत गुंतला असेल असे कोणतेही युद्ध चालू असताना असे कोणतेही अधिकथन करण्यात आल्यास, केंद्र शासनाकडून अन्यथा निदेश देण्यात येईपर्यंत त्याची नोंदणी रोखून ठेवण्यात येईल.

(२) पोटकलम (१) खाली एखाद्या [1][व्यक्तीचे] भारतीय नागरिकत्व संपुष्टात आले तर, तदनंतर त्या व्यक्तीच्या प्रत्येक अज्ञान अपत्याचेही भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल :

परंतु सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अशा कोणत्याही अपत्यास पुन्हा भारतीय नागरिकत्व घेण्याची आपली इच्छा असल्याचे अधिकथन करता येईल आणि तदनंतर त्यास पुन्हा भारतीय नागरिकत्व प्राप्त होईल.

(३) जिचा विवाह झाला आहे किंवा झाला होता अशी कोणतीही स्त्री, या कलमाच्या प्रयोजनार्थ सज्ञान असल्याचे मानण्यात येईल.

९. (१) जर एखाद्या भारतीय नागरिकाने नागरिकीकरणाद्वारे, नोंदणीद्वारे किंवा अन्यथा स्वेच्छेने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व प्राप्त केले अथवा दिनांक २६ जानेवारी, १९५० व या अधिनियमांचा प्रारंभदिनांक यांच्या दरम्यान केव्हाही स्वेच्छेने ते प्राप्त केलेले असेल तर, अशा प्राप्तीनंतर किंवा, प्रकरणपरत्वे, प्रारंभानंतर त्याचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल : नागरिकत्वाची समाप्ती.

परंतु, ज्या युद्धात भारत गुंतला असेल असे कोणतेही युद्ध चालू असताना जो भारतीय नागरिक स्वेच्छेने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व प्राप्त करील त्याला, केंद्र शासन अन्यथा निदेश देईपर्यंत या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व प्राप्त केले आहे किंवा काय, ते केव्हा किंवा कसे प्राप्त केले, यासंबंधीचा कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, या बाबतीत विहित करण्यात येईल असे प्राधिकरण त्या विहित रीतीने आणि पुराव्यासंबंधीचे तसे विहित नियम लक्षात घेऊन त्याचा निर्णय करील.

---

१. १९९२ चा अधिनियम ३९ चे कलम ३ द्वारे "पुरुषव्यक्तीचे" च्या ऐवजी घातले.

नागरिकत्वापासून वंचित करणे. १०. (१) जो भारतीय नागरिक नागरिकीकरणाद्वारे अथवा संविधानाचा अनुच्छेद ५-खंड (ग्) याच्याच आधारे अथवा संविधानाचा अनुच्छेद ६-खंड (ख्) (दोन) किंवा या अधिनियमाचे कलम ५ पोटकलम (१) खंड (क्) याखाली नव्हे तर अन्यथा नोंदणीद्वारे असा नागरिक झाला असेल, त्याला या कलमाखाली केंद्र शासनाच्या आदेशाद्वारे त्या नागरिकत्वापासून वंचित करण्यात आल्यास, त्याचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल.

(२) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, पुढील गोष्टींबद्दल केंद्र शासनाची खात्री झाल्यास ते अशा कोणत्याही नागरिकास भारतीय नागरिकत्वापासून वंचित करू शकेल :—

(क्) कपटाने, खोटे अभिवेदन करून किंवा एखादी महत्त्वाची वस्तुस्थिती लपवून त्याद्वारे नोंदणी करून घेण्यात आली आहे किंवा नागरिकीकरणाचे प्रमाणपत्र मिळविण्यात आले आहे ;

(ख्) कायद्याद्वारे प्रस्थापित झालेल्या अशा भारतीय संविधानाबद्दलची आपली निष्ठा भंग पावली आहे किंवा त्याबद्दल आपल्या ठायी अप्रीती निर्माण झाली आहे असे त्या नागरिकाने स्वतःच्या कृतीद्वारे किंवा भाषणाद्वारे दर्शविले आहे; किंवा

(ग्) भारत ज्या युद्धात गुंतला असेल असे कोणतेही युद्ध चालू असताना, त्या नागरिकाने शत्रूशी अवैधपणे व्यापार केला आहे किंवा संपर्क ठेवला आहे अथवा त्या युद्धात शत्रूस मदत होईल अशा तऱ्हेने जो कोणताही धंदा चालू असल्याचे स्वतःला माहीत आहे त्या धंद्यात तो गुंतलेला होता किंवा त्याच्याशी संबंधित होता; किंवा

(घ्) त्या नागरिकास नोंदणीनंतर किंवा नागरिकीकरणानंतर पाच वर्षांच्या आत, एखाद्या देशात किमान दोन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा झाली होती; किंवा

(ङ्) तो नागरिक सतत सात वर्षे इतका काळ सामान्यपणे भारताबाहेरील निवासी होता आणि त्या कालावधीत तो भारताबाहेरील देशातील कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा कोणत्याही वेळी विद्यार्थी नव्हता किंवा भारतातील एखाद्या शासनाच्या किंवा भारत जिचा सदस्य असेल अशा एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या सेवेत नव्हता, तसेच आपले भारतीय नागरिकत्व कायम ठेवण्यासंबंधीचा आपला इरादा त्याने वाणिज्यदूतावासाकडे दरवर्षी विहित रीतीने नोंदलेला नव्हता.

(३) एखाद्या व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व चालू ठेवणे सार्वजनिक हिताला पोषक नाही अशी केंद्र शासनाची खात्री झाल्याखेरीज ते या कलमाखाली त्या व्यक्तीला नागरिकत्वापासून वंचित करणार नाही.

(४) या कलमाखाली आदेश देण्यापूर्वी केंद्र शासन, ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्याचा विचार असेल तिला, कोणत्या कारणासाठी तो द्यावयाचा आहे ते कारण कळवणारी आणि, पोटकलम (२) मध्ये खंड (ङ) सोडून इतरत्र विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही कारणास्तव आदेश द्यावयाचा असल्यास, आपले प्रकरण या कलमाखाली चौकशी समितीकडे निर्देशित केले जाण्यासाठी विहित रीतीने अर्ज करून तशी व्यवस्था करून घेण्याचा त्या व्यक्तीला अधिकार आहे हे कळवणारी लेखी नोटीस देईल.

(५) पोटकलम (२) मध्ये खंड (ङ) सोडून इतरत्र विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही कारणा-वरून एखाद्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्याचा विचार असेल तर, एक अध्यक्ष (त्या व्यक्तीने निदान दहा वर्षे तरी एखादे न्यायिक अधिकारपद धारण केलेले असले पाहिजे) व या बाबतीत केंद्र शासनाने नियुक्त केलेले असे इतर दोन सदस्य मिळून झालेल्या चौकशी समितीकडे केंद्र शासनाला, त्या व्यक्तीने विहित रीतीने तसा अर्ज केला असल्यास, ते प्रकरण निर्देशित करावेच लागेल व अन्य कोणत्याही बाबतीत तसे करता येईल.

(६) अशा रीतीने ते प्रकरण निर्देशित करण्यात आल्यावर, चौकशी समिती, विहित असेल अशा रीतीने चौकशी करील आणि त्यासंबंधीचा आपला अहवाल केंद्र शासनाला सादर करील; आणि या कलमाखाली आदेश देण्याच्या बाबतीत सर्वसाधारणपणे असा अहवाल केंद्र शासनाला मार्गदर्शक होईल.

## पूरक

राष्ट्रकुलाचे नागरिकत्व. ११. पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या राष्ट्रकुल देशाचा नागरिक असलेल्या प्रत्येक व्यक्तीस त्या नागरिकत्वाच्या आधारे भारतातील राष्ट्रकुल नागरिकांचा दर्जा मिळेल.

विवक्षित देशांच्या नागरिकांना भारतीय नागरिकांचे अधिकार प्रदान करण्याची शक्ती. १२. (१) केंद्र शासनाला, पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही देशाच्या नागरिकांना भारतीय नागरिकांचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार प्रतियोगितेच्या तत्त्वावर प्रदान करण्यासाठी **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे उपबंध करता येतील.

(२) पोटकलम (१) खाली देण्यात आलेला कोणताही आदेश हा, भारताचे संविधान किंवा हा अधिनियम वगळून इतर कोणत्याही कायद्यात, त्या आदेशाशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरीही परिणामक होईल.

१३. ज्या व्यक्तीच्या भारतीय नागरिकत्वासंबंधी संदेह आहे अशी व्यक्ती भारताचा नागरिक आहे, असे केंद्र शासनाला, त्यास योग्य वाटेल अशा प्रकरणी प्रमाणित करता येईल; आणि या कलमा-खाली दिलेले प्रमाणपत्र कपटाने, खोटे अभिवेदन करून किंवा एखादी महत्त्वाची गोष्ट लपवून त्याद्वारे मिळविण्यात आले होते हे सिद्ध करण्यात आले नाही तर, ते प्रमाणपत्र त्याच्या दिनांकास ती व्यक्ती असा नागरिक होती यासंबंधीचा निर्णायक पुरावा, ठरेल, परंतु, ती तत्पूर्वीच्या एखाद्या दिनांकास असा नागरिक होती हे दाखवणाऱ्या कोणत्याही पुराव्यास त्यामुळे बाधा येणार नाही. संदेहास्पद बाबतीत नागरिकत्वाचे प्रमाणपत्र.

१४. (१) विहित प्राधिकरण किंवा केंद्र शासन कलम ५ किंवा कलम ६ खालील अर्ज स्वविवेकानुसार मंजूर करू शकेल किंवा फेटाळू शकेल आणि अशा मंजुरीबद्दल किंवा फेटाळणीबद्दल त्याने कोणतीही कारणे देण्याची आवश्यकता असणार नाही. कलमे ५ व ६ याखालील अर्ज निकालात काढणे.

(२) कलम १५ च्या उपबंधाच्या अधीनतेने, पूर्वोक्त अशा कोणत्याही अर्जासंबंधी विहित प्राधि-करणाचा किंवा केंद्र शासनाचा निर्णय अंतिम असेल आणि तो कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

१५. (१) विहित प्राधिकरणाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा अन्य प्राधिकरणाने (केंद्र शासन सोडून अन्य) या अधिनियमाखाली दिलेल्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या मुदतीत, त्या आदेशाच्या पुनरीक्षणासाठी केंद्र शासनाकडे अर्ज करता येईल : पुनरीक्षण.

परंतु, पुरेशा कारणामुळे अर्जदारास वेळीच अर्ज करता आला नाही याबद्दल स्वतःची खात्री झाल्यास, केंद्र शासनाला तीस दिवसांची उक्त मुदत संपल्यानंतरही तो अर्ज विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) पोटकलम (१) खाली असा कोणताही अर्ज मिळाल्यावर केंद्र शासन नाराज व्यक्तीच्या अर्जाचा आणि आदेश देणारा अधिकारी किंवा प्राधिकरण सादर करील असा त्यासंबंधीचा अहवाल यांचा विचार करून नंतर, त्या अर्जाच्या संबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल, आणि केंद्र शासनाचा निर्णय अंतिम असेल.

१६. केंद्र शासन आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, कलम १० व कलम १८ याचे उपबंध वगळता, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाद्वारे त्यास प्रदान करण्यात आली असेल अशी कोणतीही शक्ती, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा कोणत्याही विनिर्दिष्ट शर्ती असल्यास त्या शर्तींवर, याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास देखील वापरता येण्यासारखी असेल. शक्तींचे प्रत्यायोजन.

१७. या अधिनियमाखाली एखादी गोष्ट करवून घेण्यासाठी किंवा ती केली न जाण्याची तजवीज करण्यासाठी जी व्यक्ती जाणूनबुजून एखाद्या महत्त्वाच्या बाबतीत खोटे असलेले कोणतेही अभिवेदन करील अशी कोणतीही व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या करावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. अपराध.

१८. (१) केंद्र शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टीं-बाबत उपबंध करता येईल :—

(क) या अधिनियमाखाली जी गोष्ट नोंदवणे हे आवश्यक किंवा प्राधिकृत करण्यात आले आहे अशा कोणत्याही गोष्टीची नोंदणी आणि अशा नोंदणीच्या संबंधातील शर्ती व निर्बंध;

(ख) या अधिनियमाखाली वापरावयाचे नमुने व राखावयाच्या नोंदवह्या;

(ग) या अधिनियमाखाली निष्ठेच्या शपथा देणे व घेणे, आणि अशा शपथा कोणत्या मुदतीत आणि कशा रीतीने घेण्यात येतील व नोंदवण्यात येतील ते;

(घ) या अधिनियमाखाली एखाद्या व्यक्तीने जी नोटीस देणे हे आवश्यक किंवा प्राधिकृत करण्यात आले आहे अशी कोणतीही नोटीस देणे;

(ङ) या अधिनियमाखाली नागरिकत्वापासून वंचित करण्यात आलेल्या व्यक्तींची नोंदणी रद्द करणे आणि त्यांच्यासंबंधीची नागरिकीकरणाची प्रमाणपत्रे रद्द करणे व त्यांमध्ये सुधारणा करणे, आणि त्या प्रयोजनांसाठी अशी प्रमाणपत्रे परत करणे;

[1][(५ङ) कलम ६-क चे पोटकलम (६) खंड (क) आणि (ख) यात निर्दिष्ट केलेले अधिकथन ज्या रीतीने व ज्या नमुन्यात आणि ज्या प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल ती रीत, नमुना व प्राधिकरण आणि अशा अधिकथनाशी संबंधित इतर बाबी.]

---

१. १९८५ चा अधिनियम ६५, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (दिनांक ७ डिसेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

(च्) भारताबाहेर जन्मलेल्या किंवा मृत्यू पावलेल्या अशा, कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या व्यक्तींच्या जन्मांची व मृत्यूची भारतीय वाणिज्य दूतावासामध्ये नोंदणी करणे;

(छ्) या अधिनियमाखालील अर्ज, नोंदण्या, अधिकथने व प्रमाणपत्रे यांच्यासंबंधात, निष्ठेची शपथ घेण्यासंबंधात आणि दस्तऐवजांच्या प्रमाणित किंवा इतर प्रकारच्या नकला पुरविण्याच्या संबंधात फी आकारणे व ती वसूल करणे;

(ज्) दुसऱ्या देशाचे नागरिकत्व प्राप्त होण्याच्या प्रश्नावर निर्णय देणारे प्राधिकरण, अशा प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा प्रकरणाच्या संबंधातील पुरावाविषयक नियम;

(झ्) कलम १० खाली नेमलेल्या चौकशी समित्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि दिवाणी न्यायालयाला असलेल्यांपैकी कोणत्याही शक्ती, अधिकार व विशेषाधिकार अशा समित्यांना प्रदान करणे;

(ञ्) पुनरीक्षणासाठी कशा रीतीने अर्ज करता येतील ते व केंद्र शासनाने अशा अर्जांच्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती; आणि

(ट्) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली कोणताही नियम करताना केंद्र शासनाला असा उपबंध करता येईल की, त्या नियमाचा भंग झाल्यास ते कृत्य एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

[1][(४) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

१९. (निरसित) 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा अधिनियम ५८) कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ अनुसूचीचा अनुक्रमांक ४४ द्वारे पोटकलम (४) ऐवजी समाविष्ट करण्यात आले (दिनांक १५ मे, १९८६ रोजी व तेव्हापासून).

## पहिली अनुसूची

[कलमे २ (१) (ख्) आणि ५ (१) (ङ) पहा]

क. राष्ट्रकुलातील देश पुढीलप्रमाणे :—

१. युनायटेड किंग्डम.

२. कॅनडा.

३. कॉमनवेल्थ ऑफ ऑस्ट्रेलिया.

४. न्यूझीलंड.

५. युनियन ऑफ साऊथ आफ्रिका.

६. पाकिस्तान.

७. सिलोन.

८. फेडरेशन ऑफऱ्होडेशिया व न्यासालँड.

[1][९. घाना.

१०. फेडरेशन ऑफ मलाया.

११. सिंगापूर.]

ख. रिपब्लिक ऑफ आयर्लंड.

**स्पष्टीकरण.**—या अनुसूचीत, "युनायटेड किंग्डम" याचा अर्थ, ग्रेट ब्रिटन व उत्तर आयर्लंड मिळून होणारे युनायटेड किंग्डम असा आहे आणि त्यामध्ये चॅनेल आयलंडस्, आईल ऑफ मॅन आणि सर्व वसाहती यांचा समावेश होतो, व "कॉमनवेल्थ ऑफ ऑस्ट्रेलिया" या शब्दप्रयोगात पापुआ प्रदेश व नॉरफोक बेटाचा प्रदेश यांचा समावेश होतो.

---

## दुसरी अनुसूची

[कलमे ५ (२) आणि ६ (२) पहा]

### निष्ठेची शपथ

मी, क. ख. .............................................................
गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो (किंवा शपथ घेतो) की, मी कायद्याद्वारे प्रस्थापित झालेल्या अशा भारतीय संविधानाप्रत खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन, आणि निष्ठापूर्वक भारतातील कायद्यांचे पालन करीन व भारताचा नागरिक या नात्याने माझी कर्तव्ये पार पाडीन.

---

## तिसरी अनुसूची

[कलम ६ (१) पहा]

### नागरिकीकरणासाठी अर्हता

पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या देशाचा नागरिक नसेल अशा व्यक्तीला नागरिकीकरणासाठी लागणाऱ्या अर्हता पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) ज्या देशात तेथील कायद्यानुसार किंवा शिरस्त्यानुसार, भारताच्या नागरिकांना नागरिकीकरणाद्वारे त्या देशाचे प्रजाजन किंवा नागरिक बनण्यास प्रतिबंध आहे अशा कोणत्याही देशाची ती प्रजाजन किंवा नागरिक नसावी ;

(ख्) जर ती कोणत्याही देशाचा नागरिक असून तिने त्यासंबंधी तेथे अंमलात असलेल्या कायद्यानुसार त्या देशाच्या नागरिकत्वाचा त्याग केला असेल तर याप्रमाणे त्याग केल्याचे वृत्त तिने केंद्र शासनाला कळवलेले असावे;

(ग्) अर्जाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या संपूर्ण बारा महिन्यांच्या मुदतीत एकतर ती व्यक्ती भारतात राहिलेली असावी किंवा भारतातील एखाद्या शासनाच्या सेवेत राहिलेली असावी किंवा तिचे अंशतः तसे वास्तव्य व अंशतः तशी सेवा झालेली असावी;

(घ्) उक्त बारा महिन्यांच्या कालावधीच्या निकटपूर्वीच्या सात वर्षांच्या काळात ती एकतर भारतात राहिलेली असावी किंवा भारतातील एखाद्या शासनाच्या सेवेत राहिलेली असावी किंवा तिचे अंशतः तसे वास्तव्य व अंशतः तशी सेवा झालेली असावी व हे कालावधी एकंदर मिळून चार महिन्यांपेक्षा कमी असू नयेत;

---

१. १९५७ चा अधिनियम ६५, कलम २ द्वारे घातले.

(ङ्) ती व्यक्ती सच्चरित्र असावी ;

(च्) त्या व्यक्तीला संविधानाच्या आठव्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी एखाद्या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे ; आणि

(छ्) त्या व्यक्तीला नागरिकीकरणाचे प्रमाणपत्र देण्यात आल्यास, त्या व्यक्तीचा भारतात राहण्याचा अथवा भारतातील एखाद्या शासनाच्या किंवा भारत जिचा सदस्य असेल अशा एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या किंवा भारतात स्थापन झालेली संस्था, कंपनी किंवा व्यक्तीनिकाय यांच्या अखत्यारातील सेवेत प्रवेश करण्याचा किंवा तेथील सेवा चालू ठेवण्याचा इरादा असावा :

परंतु एखाद्या विशिष्ट प्रकरणाच्या विशेष परिस्थितीत स्वतःला योग्य वाटले तर, केंद्र शासन,—

(एक) उपरोक्त खंड (ग) च्या प्रयोजनार्थ अर्जाच्या दिनांकाच्या लगोलग जास्तीत जास्त सहा महिने आधी संपणारा बारा महिन्यांचा कालावधी हा जणू काही त्या दिनांकाच्या निकटपूर्वीचा आहे असे समजून त्यांची गणना करण्यास मुभा देऊ शकेल;

(दोन) वरील खंड (घ्) मध्ये उल्लेखिलेली एकंदर मुदत मोजताना, अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या आठ वर्षे आधीच्या निवासाच्या किंवा सेवेच्या कालावधीची गणना करण्यास मुभा देऊ शकेल.

# THE CITIZENSHIP ACT, 1955

## नागरिकत्व अधिनियम, १९५५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquisition of citizenship | नागरिकत्वाची प्राप्ती | [ Ss. 3 to 7-heading ] |
| a Government in India | भारतातील एखादे शासन | [ S. 2(1)(a) ] |
| as from the date | --दिनांकी व तेव्हापासून | [ S. 5(5) ] |
| be disloyal or disaffected towards | --बद्दलची निष्ठा भंग पावणे किंवा --बद्दल अप्रीती निर्माण होणे | [S. 10(2)(b) ] |
| citizen | नागरिक | [ S. 2(1)(b) ] |
| citizenship or nationality law | नागरिकत्व किंवा राष्ट्रीयत्व याविषयीचा कायदा | [ S. 2(1)(c) ] |
| commonwealth citizenship | राष्ट्रकुल नागरिकत्व | [ S. 11-m.n. ] |
| descent | वंशोद्भव | [S. 4(1)-proviso ] |
| deprivation of citizenship | नागरिकत्वापासून वंचित करणे | [ S. 10-m.n. ] |
| enemy alien | शत्रुदेशीय | [ S. 3(2)(b) ] |
| indian consulate | भारतीय वाणिज्यदूतावास | [ S. 2(1)(d) ] |
| national | राष्ट्रीक | [ S. 8(1) ] |
| on a basis of reciprocity | प्रतियोगितेच्या तत्त्वावर | [ S. 12(1) ] |
| renunciation of citizenship | नागरिकत्वाचा त्याग | [ S. 8-m.n. ] |
| subject | प्रजाजन | [ Third Sch. (a) ] |
| termination of citizenship | नागरिकत्वाची समाप्ती | [ Ss. 8 to 10-heading ] |
| undivided india | अखंड भारत | [ S. 2(1)(h) ] |

## नागरिकत्व अधिनियम, १९५५

## THE CITIZENSHIP ACT, 1955

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अखंड भारत | undivided india | [ क. २(१) (ज्) ] |
| —दिनांकी व तेव्हापासून | as from the date | [ क. ५ (५) ] |
| नागरिक | citizen | [ क. २ (१) ] |
| नागरिकत्व किंवा राष्ट्रीयत्व याविषयीचा कायदा | citizenship or nationality law | [ क. २(१) (ग्) ] |
| नागरिकत्वाचा त्याग | renunciation of citizenship | [ क. ८-स. टी. ] |
| नागरिकत्वाची प्राप्ती | acquisition of citizenship | [ क. ३ ते ७-शीर्षक ] |
| नागरिकत्वाची समाप्ती | termination of citizenship | [ क. ८ ते १०-शीर्षक ] |
| नागरिकत्वापासून वंचित करणे | deprivation of citizenship | [ क. १०-स. टी. ] |
| प्रजाजन | subject | [ तिसरी अनु-(क्) ] |
| प्रतियोगितेच्या तत्त्वावर | on a basis of reciprocity | [ क. १२ (१) ] |
| —बद्दलची निष्ठा भंग पावणे किंवा —बद्दल अप्रीती निर्माण होणे | be disloyal or disaffected towards | [ क. १० (२) (ख्) ] |
| भारतातील एखादे शासन | a Government in India | [ क. २ (१) (क्) ] |
| भारतीय वाणिज्यदूतावास | Indian consulate | [ क. २ (१) (घ्) ] |
| राष्ट्रकुल नागरिकत्व | commonwealth citizenship | [ क. ११-स. टी. ] |
| राष्ट्रीक | national | [ क. ८ (१) ] |
| वंशोद्भव | descent | [ क. ४ (१)-परंतुक ] |
| शत्रुदेशीय | enemy alien | [ क. ३(२) (ख्) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई